# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर- वसई-विरार यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे

फोन.नं. ०२२-२९४५१००१

Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र १०१ दिनांक- १५/०४/२०२१

**" कोवीड-१९" आजाराने ॲडमीट असेलेल्या रुग्णांची नावे व आधार कार्डांच्या सहाय्याने कोवीड-१९ आजाराची खोटी निगेटिव्ह सर्टिफीकेट तयार करणारा गुन्हे शाखा कक्ष-१ काशिमीरा यांनी केला गजाआड.**

दिनांक १४/०४/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत बातमी मिळाली की , एस.आर.एल. लॅब, मिरारोड स्टेशन येथे काम करणारा कृष्णा सरोज हा इसम १०००/- रुपयांचे बदल्यात त्यास लोकांच्या आधारकार्डचा फोटो पाठविल्यानंतर कोणत्याही प्रकारे स्वॅब न घेता व कोणतीही टेस्ट न करता त्याचे कोवीड-१९ हया आजाराचे बनावट निगेटिव्ह सर्टिफीकेट देत आहे. सदर बातमीची माहीती पोलीस निरीक्षक श्री अविराज कुराडे यांनी वरीष्ठांना कळवुन सदर बातमीच्या अनुशंगाने कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश प्राप्त केले.

आरोपीत नामे **कृष्णा रामदुलार सरोज**, वय २६ वर्षे, व्यवसाय-**लॅब टेक्नीशियन**, रा. मोतीलाल सुमेर यादव चाळ, नालापार, इराणीपार, अभिलाख नगर, लालजी पाडा, कांदीवली पश्चिम मुंबई नं. ६७. मुळ रा. पशियान, पोलीस ठाणे, गोसाई बाजार, जिल्हा आजमगढ, राज्य उत्तरप्रदेश हा लोकांचे कोणत्याही प्रकारचे स्वॅब न घेता व चाचणी न करता, प्रत्येकी १०००/- रुपयांचे बदल्यात लोकांच्या आधारकार्डचा फोटो पाठविल्यानंतर त्याचे बनावट "कोवीड-१९" हया आजाराचे खोटे निगेटिव्ह सर्टिफीकेट तयार करुन देत असल्याच्या मिळालेल्या बातमी प्रमाणे बोगस गिऱ्हाईक याचे मोबाईल फोन वरुन **कोवीड-१९ या आजाराने वेगवेगळया दवाखान्यात ॲडमीट असलेल्या व रेमडीसिव्हर सारखी इंजेक्शन घेत असलेल्या ५ पेशंटची व बोगस गिऱ्हाईक अशा एकुण ६** लोकांची नावे व आधार कार्डचे फोटो पाठवुन दिले. चार तासांनी वरील ६ लोंकाचे कोवीड-१९ आजाराचे निगेटीव्ह सर्टीफीकेट बनवुन त्याचे मोबदल्यात रोख रक्कम ६,०००/- स्विकारत असतांना सदर इसम मिळुन आल्याने त्यास ताब्यात सखोल विचारपुस केली असता, तो कोणत्याही प्रकारे स्वॅब न घेता तसेच कोणतीही चाचणी न करता पैशाच्या मोबदल्यात खोटे कोवीड-१९ आजाराचे निगेटिव्ह सर्टिफीकेट बनवुन देत असल्याचे दिसुन आले आहे. त्याचे कडुन एस.आर.एल. डायग्नोस्टीक नाव असलेली कोवीड-१९ आजारोची निगेटीव्ह ०६ सर्टीफिकेट व एक मोबाईल फोन जप्त करण्यात आला आहे. त्याचेवर नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा रजी.नं. I २९०/२०२१ भा.द.वि.स कलम ४६५,४६८,४७१, **प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.**

सदरची कामगीरी मा.श्री. डॉ.महेश पाटील पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा. श्री. रामचंद्र देशमुख सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अविराज कुराडे, पोउपनिरी. हितेंद्र विचारे, पो.हवा./३६ संदीप शिंदे, पोहवा/२२१७ किशोर वाडिले, पोहवा/१८५० संजय शिंदे, नेम. गुन्हे प्रकटीकरण शाखा-१ यांनी केली असून गुन्हयांचा पुढील तपास नयानगर पोलीस स्टेशन हे करीत आहेत.

Scanned with CamScanner